6761

<u>आरोग्य सेवा</u>

जा.क्र.जिपना/NHM/पुनर्नियुक्ती/ /२०२२
**कार्यालय** :- जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर
दिनांक : ०९|११|२०२२

**प्रति,**

१) वैद्यकिय अधिक्षिका/अधिक्षक,
डागा स्त्री/उपजिल्हा/ग्रामिण, रुग्णालय.....(सर्व)
२) तालुका आरोग्य अधिकारी,
तालुका आरोग्य कार्यालय,.......(सर्व)
३) जिल्हा क्षयरोग अधिकारी, नागपूर
४) जिल्हा हिवताप अधिकारी, नागपूर
५) वैद्यकिय अधिकारी, रा.ना.आ.अ. कामठी व उमरेड.
६) कार्यक्रम समन्वयक, रा.आ.अ. .....(सर्व)

**विषय :- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी पध्दतीने कार्यरत कर्मचारी यांच्या पुर्ननियुक्तीबाबतच्या मार्गदर्शक सुचना.**

**संदर्भ:-** १) मंजूर कृती आराखडा सन २०२२-२३.
२) मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, रा.आ.अ. मुंबई यांचे पत्र क्र. राआसो/मनुष्यबळ/पुर्ननियुक्ती मार्गदर्शक सुचना/१२५०४१-४४३/२०२२ दि. २८/१०/२०२२.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास सुचित करण्यात येते की, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी तत्वांवर कार्यरत सर्व अधिकारी/कर्मचारी यांची राज्यस्तरावरुन प्राप्त मार्गदर्शक सुचनेनुसार पुनर्नियुक्ती कालावधी व त्याबाबत करावयाची कार्यवाही खालीलप्रमाणे राहील.

१) यापुढे दरवर्षी कंत्राटी कर्मचाऱ्यांचा पुनर्नियुक्ती कालावधी हा ११ महिने २९ दिवस असेल. सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना दि. ०१ जुलै ते पुढील वर्षाचे दि. २९ जुन या कालावधीसाठी राहील.
२) दि. १ जुलै नंतर नियुक्ती दिलेल्या कर्मचाऱ्यांना पहिली नियुक्ती पुढील वर्षाच्या दि. २९ जुन पर्यत देण्यात यावी.
३) पुनर्नियुक्तीसाठी विचारात घ्यावयाचे अहवाल आणि पुनर्नियुक्ती प्राधिकारी हे सध्दा लागू असलेल्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे राहतील. यामध्ये कोणताही बदल केलेला नाही.
४) पुनर्नियुक्ती नस्तीसोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावीत.-

अ) कर्मचाऱ्यांचा पुनर्नियुक्ती मिळण्यासाठीचा विनंती अर्ज
ब) Performance Report.
क) Minimum Performance Benchmark (लागू असल्यास)

५) पुनर्नियुक्ती नस्तीबाबत खालील तक्त्यात नमूदप्रमाणेय कार्यवाही करावी-

| अ.क्र | कार्यवाही | अंतिम तारीख |
|---|---|---|
| १ | कर्मचाऱ्याने पुनर्नियुक्तीसाठी अर्ज करणे | २० ते २३ मे पर्यत |
| २ | प्रतिवेदन अधिकाऱ्याने कर्मचाऱ्यांचे मुल्यमापन अहवाल लिहिणे, Minimum Performance Benchmark अहवाल तयार करणे. | २४ ते पर्यत |
| ३ | या अहवालावर पुनर्विलोकन करणे | ०१ जुन पर्यत |
| ४ | कर्मचाऱ्यांचा अर्ज, अहवाल यासह परिपुर्ण प्रस्ताव पुनर्नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे सादर करणे | ०७ जुन पर्यत |
| ५ | पुनर्नियुक्ती प्राधिकाऱ्याने प्रस्तावास मंजूरी देणे | १५ जुन पर्यत |

| | | |
|---|---|---|
| ६ | पुनर्नियुक्तीची शिफारस मान्य केलेल्या कर्मचाऱ्यास पुनर्नियुक्ती आदेश देणे | २२ जुन पर्यत |
| ७ | पुनर्नियुक्ती आदेश दिलेल्या कर्मचाऱ्याने नवीन कंत्राटाप्रमाणे रुजू होणे | १ जुलै (सुष्टी असल्यास पुढील पहिला कामाचा दिवस) |

६) ज्या कर्मचाऱ्यांना राज्यस्तरावरुन पुनर्नियुक्ती देण्यात येते, त्यांचे प्रस्ताव दरवर्षी ७ जुन पर्यत राज्यस्तरावर प्राप्त होतील याची दक्षता घ्यावी.

७) नियुक्ती कालावधी पुर्ण करण्यापुर्वी सेवा समाप्ती/राजीनामा देणेबाबत खालील सुचनांचे पालन करावे.

अ) कंत्राटी कर्मचाऱ्यांचे कार्यक्रमनिहाय निर्देशांक व घटकानुसार (Program indicator and parameters) मुल्यांकन अहवाल असमाधानकारक असल्यास आणि वारंवार सुचना देऊनही त्यात सुधारणा होत नसल्यास अशा कर्मचाऱ्यांस १ महिन्याची नोटीस देऊन सेवा समाप्ती करावी.

ब) कंत्राटी कर्मचाऱ्याने करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास आल्यास याबाबत प्रथम चौकशी करण्यात येऊन चौकशी अंती हे सिध्द झाल्यास करारनाम्यामधील तरतुदीनुसार त्यांची सेवा समाप्त करावी. तथापी, कंत्राटी कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्यास नियुक्ती प्राधिकारी अशा कर्मचाऱ्यांची सेवा तात्काळ समाप्त करु शकतील.

क) कंत्राटी कर्मचाऱ्यांचे शासनाच्या कोणत्याही विभागात निवड झाली असल्यास तसेच निवड झालेल्या पदावर एक महिन्यापुर्वी हजर होणे आवश्यक असल्यास अशा कर्मचाऱ्यास राजीनाम्यापुर्वी १ महिना नोटीस या अटीतुन मुक्त करावे आणि विनंती नुसार त्वरीत कार्यमुक्त करण्यात यावे.

८) प्रत्येक कर्मचाऱ्यांस दरवर्षी दि. २९ जुन रोजी कार्यमुक्त करण्यात यावे. कार्यमुक्तीचे रितसर आदेश काढून ते संबंधित कर्मचाऱ्यांना बजावण्यात यावेत.

९) तसेच अ.क्र. च्या तक्त्यात नमूद केल्यानुसार दिलेल्या कालावधीमध्ये पुनर्नियुक्तीचा अर्ज सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत कर्मचाऱ्यांची राहील.

१०) ज्या कर्मचाऱ्यांच्या बाबत दि. २९ जुन पर्यत पुनर्नियुक्ती आदेश निर्गमित केले नाहीत, त्या कर्मचाऱ्यांचा पदभार/कार्यभार दि. ०१ जुलै रोजी प्रशासकिय कामकाजाच्या सोईनुसार इतर कंत्राटी कर्मचारी/नियमित अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात यावा. याचा स्पष्ट उल्लेख कार्यमुक्तीच्या आदेशात करण्यात यावा.

११) कार्यमुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांस पुनर्नियुक्ती आदेश प्राप्त झाल्याशिवाय दि. ०१ जुलै रोजी रुजू करुन घेऊ नये.

१२) ज्या कर्मचाऱ्यांचा मुल्यांकन अहवाल असमाधानकारक श्रेणीमध्ये आहे, अशा कर्मचाऱ्यांना पुनर्नियुक्ती देण्यात येऊ नये.

<u>सहपत्र</u> - राज्यस्तरावरुन प्राप्त मार्गदर्शक सुचना.

O/C DPM

**सदस्य सचिव**
**जि.ए.आ. व कु.क. सो.**
**तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद, नागपूर**

**प्रत माहितीस सविनय सादर :-**

१) मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, रा.आ.अ. मुंबई
२) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर
३) मा. उपसंचालक, आरोग्य सेवा नागपूर मंडळ, नागपूर
४) मा. जिल्हा शल्य चिकित्सक, सर्वोपचार रुग्णालय, नागपूर

**प्रत माहितीस व योग्य कार्यवाहीसः-**

१) जिल्हा माताबाल संगोपन अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर

२) जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, रा.आ.अ. जि.प. नागपूर

३) जिल्हा लेखा व्यवस्थापक, रा.आ.अ. जि.प. नागपूर

सदस्य सचिव
जि.ए.आ. व कु.क. सो.
तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर

6761

**आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान**
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

| | |
|---|---|
| दुरध्वनी – ०२२ – २२७१७५०० <br> फॅक्स – ०२२ – २२६४२९५५ <br> E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com | आरोग्य भवन, ३रा मजला, <br> सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, <br> सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१ |

परिपत्रक जा.क्र.राआसो/मनुष्यबळ/पुर्ननियुक्ती मार्गदर्शक सूचना/ १२५०४१-४४३ /२०२२

दिनांक :- २५ २८/१०/२०२२

प्रति,

१. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

३. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय (सर्व)

४. जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)

**विषय - राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी पद्धतीने कार्यरत कर्मचारी यांच्या पुर्ननियुक्तीबाबतच्या मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ -** १) ३२ व्या कार्यकारी समितीचे निर्णयाचे दि. ११ ऑक्टोबर २०२१ रोजीचे मंजूर इतिवृत्त.

२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.राआसो/मनुष्यबळ/११०६८८-९३६/२०२२ दि. ०३/०१/२०२२

३) या कार्यालयाची मंजुर टिपणी दिनांक २०/१०/२०२२.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यक्रम अंमलबजावणीच्या आवश्यकतेनुसार मोठ्या प्रमाणात कंत्राटी कर्मचारी नेमण्यात येतात. प्रति माह रु.३०,०००/- पर्यंत वेतन घेणा-या कंत्राटी कर्मचा-यांच्या पुनर्नियुक्त्या मंडळे / जिल्हा / प्रशिक्षण संस्था/ महानगरपालिका/ परिमंडळ स्तरावर आणि उर्वरीत कंत्राटी कर्मचा-यांच्या नियुक्ती राज्यस्तरावर देण्यात येतात.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत पुनर्नियुक्ती द्यावयाबाबतच्या मार्गदर्शक सूचना यापूर्वी निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक कंत्राटी कर्मचा-यांचे पुनर्नियुक्ती आदेश त्यांचा/तिचा सुरु असलेला कंत्राटी कालावधी पूर्ण होण्यापूर्वी मिळणे आवश्यक आहे. परंतु अपुर्ण प्रस्ताव सादर करणे, कंत्राटी कालावधी संपल्यानंतर प्रस्ताव सादर करणे इत्यादी कारणांमुळे वेळेत पुनर्नियुक्ती देणे शक्य होत नाही. यामुळे कंत्राट कालावधी संपलेले असुनही असे कर्मचारी कार्यरत राहतात. हे कर्मचारी प्रशासकीय नस्ती, अहवाल, आर्थिक व्यवहार इत्यादि बाबींवर स्वाक्षरी करतात किंवा निर्णय घेतात. या बाबी प्रशासकीय दृष्टया गंभीर अनियमितता या सदरात मोडतात. अशा बाबी पुन्हा घडू नये यासाठी, तसेच पुनर्नियुक्ती प्रक्रिया सुरळीत रहावी यास्तव पुढील प्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

**अ) कंत्राटी कालावधी व मुल्यमापन अहवाल/** Minimum Performance Benchmark Report –

१) यापुढे दरवर्षी कंत्राटाचा कालावधी हा ११ महिने २९ दिवस असेल. सर्व कंत्राटी कर्मचा-यांना दि.१ जुलै ते पुढील वर्षाचे दि.२९ जून या कालावधीसाठी पुनर्नियुक्ती आदेश देण्यात यावेत.

२) दि.१ जुलै नंतर नियुक्ती दिलेल्या कर्मचा-यांना पहिली नियुक्ती पुढील वर्षाच्या दि.२९ जून पर्यंत देण्या यावी.

३) पुर्ननियुक्तीसाठी विचारात घ्यावयाचे अहवाल आणि पुनर्नियुक्ती प्राधिकारी हे सध्या लागू असलेल्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे राहतील. यामध्ये कोणताही बदल केलेला नाही.

Scanned with OKEN Scanner

ब) पुनर्नियुक्तीसाठीच्या कालमर्यादा व पुनर्नियुक्ती प्रक्रिया दरवर्षी खालील दिलेल्या तारखानुसार करण्यात यावी.

| अ.क्र | कार्यवाही | अंतिम तारीख |
|---|---|---|
| १. | कर्मचा-याने पुर्ननियुक्तीसाठी अर्ज करणे | २० ते २३ मे |
| २ | प्रतिवेदन अधिका-याने कर्मचा-यांचे मुल्यमापन अहवाल लिहिणे, Minimum Performance Benchmark अहवाल तयार करणे. | २४ मे |
| ३. | या अहवालावर पुर्नविलोकन करणे. | ०१ जून |
| ४. | कर्मचा-यांचा अर्ज, अहवाल यासह परिपुर्ण प्रस्ताव पुनर्नियुक्ती प्राधिका-याकडे सादर करणे. | ०७ जून |
| ५. | पुनर्नियुक्ती प्राधिका-याने प्रस्तावास मंजूरी देणे . | १५ जून |
| ६. | पुनर्नियुक्तीची शिफारस मान्य केलेल्या कर्मचा-यांस पुनर्नियुक्ती आदेश देणे. | २२ जून |
| ७. | पुनर्नियुक्ती आदेश दिलेल्या कर्मचा-याने नवीन कंत्राटाप्रमाणे रुजू होणे. | १ जुलै (सुट्टी असल्यास पुढील पहिला कामाचा दिवस) |

**क) पुनर्नियुक्ती देण्यासाठी आवश्यक कागदपत्रे-**

कर्मचा-याने पुनर्नियुक्तीसाठी विनंती करताना प्रस्तावासोबत खालील पत्रे सादर करणे आवश्यक आहे.

१) कर्मचा-यांचा पुनर्नियुक्ती मिळण्यासाठीचा विनंती अर्ज.

२) Performance Report .

३) Minimum Performance Benchmarks (लागू असल्यास)

**ड ) राज्यस्तरावर पुनर्नियुक्तीसाठी पाठविण्याचे प्रस्ताव-**

ज्या कर्मचा-यांना राज्यस्तरावरुन पुनर्नियुक्तीदेण्यात येते, त्यांचे प्रस्ताव दरवर्षी ७ जून पर्यंत राज्यस्तरावर प्राप्त होतील याची दक्षता घ्यावी.

**इ) नियुक्ती कालावधी पुर्ण करण्यापुर्वी सेवा समाप्ती / राजीनामा देणे.**

१) कंत्राटी कर्मचा-याचे कार्यक्रमनिहाय निर्देशांक व घटकानुसार (Program indicator and parameters) मुल्यांकन अहवाल असमाधानकारक असल्यास आणि वारंवार सुचना देऊनही त्यात सुधारणा होत नसल्यास अशा कर्मचा-यास १ महिन्याची नोटीस देऊन सेवा समाप्ती करावी.

२) कंत्राटी कर्मचा-याने करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास आल्यास याबाबत प्रथम चौकशी करण्यात येऊन चौकशी अंती हे सिध्द झाल्यास करारनाम्यामधील तरतुदीनुसार त्यांची सेवा समाप्त करावी. तथापी, कंत्राटी कर्मचा-यांवर फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्यास नियुक्ती प्राधिकारी अशा कर्मचा-यांची सेवा तात्काळ समाप्त करु शकतील.

३) कंत्राटी कर्मचा-याचे शासनाच्या कोणत्याही विभागात निवड झाली असल्यास तसेच निवड झालेल्या पदावर एक महिन्यापूर्वी हजर होणे आवश्यक असल्यास अशा कर्मचा-यास राजीनामापुर्व १ महिना नोटीस या अटीतुन मुक्त करावे आणि विनंती नुसार त्वरीत कार्यमुक्त करण्यात यावे.

**ई) पुनर्नियुक्ती संदर्भाने इतर महत्वाच्या बाबी-**

१. प्रत्येक कर्मचा-यांस दरवर्षी दि.२९ जून रोजी कार्यमुक्त करण्यात यावे. कार्यमुक्तीचे रितसर आदेश काढून ते संबंधित कर्मचा-यांना बजावण्यात यावेत.

Scanned with OKEN Scanner

२. तसेच तक्ता क्र.ब मध्ये नमूद केल्यानुसार दिलेल्या कालावधीमध्ये पुर्ननियुक्तीचा अर्ज सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कर्मचा-यांची राहील.

३. ज्या कर्मचा-यांच्या बाबत दि.२९ जून पर्यंत पुनर्नियुक्ती आदेश निर्गमीत केले नाहीत, त्या कर्मचा-यांचा पदभार /कार्यभार दि.०१ जुलै रोजी प्रशासकीय कामकाजाच्या सोईनुसार इतर कंत्राटी कर्मचारी/ नियमित अधिकारी /कर्मचारी यांना देण्यात यावा. याचा स्पष्ट उल्लेख कार्यमुक्तीच्या आदेशात करण्यात यावा.

४. कार्यमुक्त केलेल्या कर्मचा-यांस पुनर्नियुक्ती आदेश प्राप्त झाल्याशिवाय दि.०१ जुलै रोजी रुजू करुन घेऊ नये.

५. ज्या कर्मचा-यांचा मुल्यांकन अहवाल असमाधानकारक श्रेणीमध्ये आहे, अशा कर्मचा-यांना पुनर्नियुक्ति देण्यात येऊ नये.

६. सर्वच कर्मचा-यांची नियुक्ती/पुनर्नियुक्ती कालावधी २९ जुन रोजी संपणार असल्यामुळे ५% वार्षिक मानधन वाढ देताना खालील मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे.

I. दिनांक ०३/०२/२०२२ च्या परिपत्रकातील तरतुदीनुसार जे कर्मचारी Minimum Performance Benchmarks चे निकष पूर्ण करीत आहेत व ज्याचा कार्यक्रमनिहाय निर्देशांक व घटकानुसार मुल्यांकन अहवालातील शेरा हा Excellent किंवा Outstanding आहेत त्यांनाच ५ टक्के वार्षिक मानधनवाढ देण्यात यावी.

II. तसेच ज्या कर्मचा-यांचा पुर्नर्नियुक्ती कालावधीमधील कार्यक्रमनिहाय निर्देशांक व घटकानुसार मुल्यांकन अहवालातील शेरा हा Good आहे अशा कर्मचा-यांना १२ महिन्यांची पुर्ननियुक्ती देण्यात यावी. तथापि, त्यांना ५ टक्के वार्षिक मानधनवाढ देण्यात येऊ नये.

III. ज्या कर्मचा-यांचा पुनर्नियुक्ति कालावधी दि.२९ जून रोजी संपुष्टात येईल अशा कर्मचा-यांना त्यांच्या पुर्ननियुक्तीच्या दिनांका पासुन ते दि.२९ जुन पर्यंत जेवढया महिन्याचा कालावधी होईल तेवढया महिन्याच्या समप्रमाणामध्ये (म्हणजेच प्रतिमाह ०.४२ टक्के) कर्मचा-यांच्या कार्यक्रमनिहाय निर्देशांक व घटकानुसार (Program indicator and parameters) त्यांच्या कामकाजाचे पुर्नमुल्यांकन करुन ५ % वार्षिक मानधनवाढ देण्यात यावी.

उपरोक्तनुसार कार्यवाही या वर्षाच्या ऑक्टोबर २०२२ पासून करण्यात यावी. त्यानुसार सर्व स्तरावरील पुर्ननियुक्त्या प्रत्येक वर्षाच्या दि.२२ जुन पर्यंत पुर्ण करावेत. तसेच राज्यस्तरावर सादर करावयाचे पुर्ननियुक्त्यांचे प्रस्ताव दरवर्षी दि.०७ जून पर्यंत सादर करावेत. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक यांनी दरवर्षी दि. ०१ जुलै नंतर एकही कर्मचारी पुनर्नियुक्ति शिवाय राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

तुकाराम मुंढे (भा.प्र.से.)
आयुक्त,आरोग्य सेवा तथा
संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान,
महाराष्ट्र,मुंबई.

प्रत माहितीस्तव,

१. संचालक, आरोग्य सेवा १/२, मुंबई/पुणे.
२. संचालक (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३. सहसंचालक (तांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

Scanned with OKEN Scanner